माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १४७१/२०२१**

**अपिलार्थी, श्रीमती मिनल निलेश बारापात्रे,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक,**
राज्य परिवहन पवनी, आगार, जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा विभाग, भंडारा ता.जि. भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०३.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९.१०.२०२० | निरंक | २३.११.२०२० | ०६.०१.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १९.१०.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " श्री. निलेश बारापात्रे, यांचे माहे जून २०१७ पासूनचे पगार विवरणपत्र, तसेच सदर कालावधीत घेतलेले त्यांनी विविध पतसंस्था अथवा बँकेतून घेतलेले कर्ज विवरण" याविषयी माहिती मागीतली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २३.११.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६.०१.२०२१ रोजी सूनावणी घेवून, आदेशात अपिपुलकर्ता यांना जोडपत्र-अ नुसार मागणी केलेली राज्य परिवहन महामंडळाचे परिपत्रकीय सुचनानुसार माहिती अधिकाराअंतर्गत देय नाही व तसे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना लेखी मुदतीत कळविले असल्याने व आता नव्याने कोणतीही माहिती देय नसल्याने ही अपिल निरस्त करण्यात येत आहे, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०५.०७.२०२१ रोजी** " चुकीचा निर्णय दिल्याबाबत " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे.सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २८.०३.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा



माहिती आयोग खंडपीठ नागपूर

आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन पवनी, श्री. गूणवंत हरिभाऊ तागडे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ भंडारा श्रीमती तनुजा अहिरकर उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी सादर केलेला द्वितीय अपील अर्ज मंजुर करीत जोडपत्र अ मध्ये नमुद श्री. निलेश बारापात्रे यांच्या मागील माहे जून २०१७ पासूनचे पगार विवरणपत्र, तसेच बँकेतून घेतलेले कर्ज विवरण पगार पत्रकाची (Generatic Details) एकुण पगार व निव्वळ पगार (gross salary and net salary) यातील इतर वगळून किंवा ते वगळणे शक्य नसल्यास त्यांना मास्क करुन अपिलार्थी यांना विनामुल्य माहिती प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाल काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २८.०३.२०२३**

जावक क्रमांक 8EE8 दिनांक 7 DEC 2023